بِسْمِ اللّٰہِ الرَّحْمٰنِ الرَّحِیْمِ نَحْمَدُہٗ وَ نُصَلِّیْ عَلٰی رَسُوْلِہِ الْکَرِیْمِ وَعَلٰی عَبْدِہِ الْمَسِیْحِ الْمَوْعُوْد
لَا اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ مُحَمَّدٌ رَّسُوْلُ اللّٰہ
دفتر مجلس انصار اللہ بھارت
Office Of The Majlis Ansarullah Bharat
Mohallah Ahmadiyya Qadian-143516, Distt.Gurdaspur (Punjab) INDIA
Mob.9682536974, E-Mail :ansarullah@qadian.in محلہ احمدیہ قادیان ۱۴۳۵۱۶ ضلع: گورداسپور (پنجاب)

# न्याय, दयाळूपणा आणि लोकांचे हक्कांविषयी हजरत अपेक्षित मसीह व महदी (अ.स.) यांचे आशीर्वादित वचन व भाष्य. पाकिस्तानातील अहमदींसाठी प्रार्थनेचे पुनश्चय आग्रह.

सारांश प्रवचन खुतबा हजरत मिर्जा मसरूर अहमद, मसीहाचे पंचम खलीफा (अल्लाह त्यांचा सहाय्यक असो) दिनांक ५ मे २०२३, मशिद मुबारक, टिलफोर्ड यु.के.

أَشْهَدُ أَنْ لَا إِلٰهَ إِلَّا اللّٰهُ وَحْدَهُ لَا شَرِيْكَ لَهُ وَأَشْهَدُ أَنَّ مُحَمَّدًا عَبْدُهُ وَرَسُوْلُهُ أَمَّا بَعْدُ فَأَعُوْذُ بِاللّٰهِ مِنَ الشَّيْطٰنِ الرَّجِيْمِ۔
بِسْمِ اللّٰهِ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ اَلْحَمْدُ لِلّٰهِ رَبِّ الْعٰلَمِيْنَ۔ الرَّحْمٰنِ الرَّحِيْمِ۔ مٰلِكِ يَوْمِ الدِّيْنِ۔ إِيَّاكَ نَعْبُدُ وَإِيَّاكَ
نَسْتَعِيْنُ۔ اِهْدِنَا الصِّرَاطَ الْمُسْتَقِيْمَ۔ صِرَاطَ الَّذِيْنَ أَنْعَمْتَ عَلَيْهِمْ غَيْرِ الْمَغْضُوْبِ عَلَيْهِمْ وَلَا الضَّآلِّيْنَ۔

तशहहुद तआवुज, सूरह फातिहा आणि सूरह अन्-नहलची आयत ९१ पठन केल्यानंतर हुजूर अनवर'नी या आयतीचे अनुवाद प्रस्तूत केले,

إِنَّ اللّٰهَ يَأْمُرُ بِالْعَدْلِ وَالْإِحْسَانِ وَإِيتَاءِ ذِي الْقُرْبٰى وَيَنْهٰى عَنِ الْفَحْشَاءِ وَالْمُنْكَرِ وَالْبَغْيِ يَعِظُكُمْ لَعَلَّكُمْ تَذَكَّرُوْنَ

(अनुवाद) निःसंशय, अल्लाह न्याय करण्याची आणि इतरांचे भले करण्याची, आणि नातेवाईकांप्रमाणेच (इतरांना सहाय्य) देण्याची आज्ञा देत आहे. आणि लज्जास्पद वर्तन, दुष्कृत्य आणि अनाचार करण्यास मनाई करत आहे. तो तुम्हाला यासाठी उपदेश करीत आहे की तुम्ही त्यापासून बोध घ्यावा.

हुजूर म्हणाले: ही आयत प्रत्येक शुक्रवारी आणि ईदच्या दुसऱ्या प्रवचनात पठन केली जाते. या श्लोकात काही चांगले कर्म करण्याचे आणि काही वाईट कर्म टाळण्याचे उल्लेख आहे, आणि खऱ्या श्रद्धावंत होण्यासाठी या उपदेशांवर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. आज मी हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांचे, या आयतीत सांगितलेल्या सद्गुणांच्या संदर्भात, म्हणजे लोकांशी न्याय,भलाई आणि नातेवाईकांशी चांगली वागणूक विषयी काहीं उद्धृत प्रस्तूत करेन. त्यांचे सर्व वचन एकाच अक्षाभोवती फिरत आहेत असे वाटते पण त्यांनी विविध रंगात उपदेश दिलेले आहेत.

हे उपदेश आपल्याला अल्लाहच्या आदेशानुसार आपले जीवन जगण्यासाठी मार्गदर्शन करतात. जर आपण या उपदेशांचा विचार केलात आणि त्यांनुसार आपले जीवन व्यतित करण्याचा प्रयत्न केलात, तर निश्चितच आपण अल्लाह सोबतचे आपले नाते दृढ करू शकतो आणि एकमेकांचे हक्क अतिशय चांगल्या पद्धतीने अदा करू शकतो.

अल्लाहचे हक्क आणि त्याच्या निर्मितीचे हक्क अदा करणे हाच समाज आणि जगाच्या शांततेची हमी आहे. पण दुर्दैवाने जग याकडे लक्ष देत नाही आणि मुस्लीम देश असो की उर्वरित जग, प्रत्येकजण एकमेकांचे हक्क नष्ट करण्याच्या प्रयत्नात व्यस्त आहे. अशा परिस्थितीत, हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्यांची जबाबदारी आहे की त्यांनी स्वतःला सुधारावे आणि जगाला त्यांच्याकडे आकर्षित करावे.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणतात: देवाने तुम्हाला आज्ञा केली आहे की तुम्ही त्याच्याशी आणि त्याच्या सृष्टीशी न्यायाने व्यवहार करा, म्हणजेच अल्लाहचे हक्क आणि सेवकांचे हक्क पूर्ण करा आणि जर तुम्ही त्याहून अधिक करू शकत असाल तर फक्त न्याय नाही तर परोपकारपर्यंत पोहोचा. म्हणजेच कर्तव्यापेक्षा अधिक देवाची सेवा करा आणि एवढ्या प्रामाणिकपणे की तुम्ही त्याला पाहिल्यासारखे वाटावे. विहित असलेल्या वाणगूकीपेक्षा जास्त प्रमाणात लोकांशी वागा, आणि जर तुम्ही त्यापेक्षा जास्त करू शकत असाल, तर परमेश्वराची उपासना आणि त्याच्या निर्मितीची विनाकारण आणि नि:स्वार्थीपणे सेवा करा, जशी व्यक्ती नातेसंबंधाच्या भावनेने करते.

परत या वचनानुसार निर्माताचे हक्क आणि अधिकाराबद्दल विस्ताराने सांगतात की, खरं तर, अल्लाहशिवाय कोणीही उपासनेस पात्र नाही, कोणीही प्रेमास पात्र नाही, कोणीही विश्वासास पात्र नाही, कारण निर्मिती आणि सार्वभौमत्व आणि प्रभुत्वाचा प्रत्येक अधिकार त्याच्याकडे आहे. जर तुम्ही हे केले, तर हा न्याय आहे, जो तुमच्यावर बंधनकारक आहे. मग जर तुम्हाला त्याच्यापुढे प्रगती करायची असेल, तर ती दयाळूपणाची पातळी आहे आणि ती म्हणजे तुम्ही त्याच्या महानतेची इतकी खात्री बाळगा आणि त्याच्यासमोर उपासना करताना इतके नम्र व्हा आणि तुम्ही त्याच्या प्रेमात स्वतःला हरवून घ्या जणू त्याचे वैभव आणि प्रताप आणि शाश्वत सौंदर्य तुम्ही पाहिले आहे. यानंतर जवळीक संबंधाचा घटक आहे, आणि तो म्हणजे तुमची उपासना आणि तुमचे प्रेमसंबंध आणि तुमची आज्ञापालन, सर्व देखावा आणि कृत्रिमतापासून विच्छेदित असावे आणि अशा आवेगाने तुम्ही त्याचे स्मरण करा जसे तुम्ही तुमच्या वडिलांची आठवण करता आणि तुमचे प्रेम एखाद्या मुलाचे त्याच्या प्रिय आईवरच्या प्रेमासारखे असावे.

परत निर्मितींच्या हक्कांबद्दल या आयतीचे अर्थ विशद करताना सांगतात की, आपल्या बंधू आणि नातेवाईकांशी न्याय करा आणि आपल्या हक्कांपेक्षा त्यांच्यावर सक्ती करू नका आणि न्यायाला चिकटून राहा. जर तुम्हाला या स्तरावरून प्रगती करायची असेल, तर त्यापलीकडे दयाळूपणाची एक पातळी आहे आणि ती म्हणजे आपल्या भावाच्या वाईटवागणूकविरुद्ध चांगली वागणूक बाळगा. त्याच्या वेदनांच्या बदल्यात, तुम्ही त्याला आराम द्या आणि बक्षीस आणि उपकाराद्वारे त्याची सहाय्यता करा. मग त्याच्या नंतर जवळीक नातेवाईकांची पातळी आहे, आणि ती म्हणजे तुम्ही तुमच्या भावाचे कितीही भले केले किंवा मानवजातीचे कितीही भले केले, तरी त्याच्याकडून कोणत्याही

प्रकराचे उपकार न स्वीकारावे, किंबहुना कोणतीही तमा न बाळगता ती स्वाभाविकपणे तुझ्याहस्ते कार्य व्हावे. जसे संबंधाच्या तीव्रतेतून एक व्यक्ति दुसऱ्याचे भले करतो.

तर, निर्मितीशी करुणा बाळगण्यामागे कोणतेही स्वार्थ किंवा हेतू नसावे किंबहुना मानवी बंधुत्वाचा आणि नातेसंबंधाचा उत्साह कोणत्याही कष्टाशिवाय आणि तथाकथित कृतज्ञतेशिवाय आपोआप उच्च पातळीवर विकसित व्हावे, ही नैतिक विकासाची अंतिम परिपूर्णता आहे. मग एका प्रसंगी ते म्हणतात की या श्लोकात सर्वशक्तिमान अल्लाहने मानवी ज्ञानाच्या तीन स्तरांचे वर्णन केले आहे आणि तिसऱ्या स्तराला वैयक्तिक प्रेमाचा स्तर जाहीर केला आहे. हा तो स्तर आहे ज्यामध्ये सर्व स्वार्थी हेतू जळून जातात आणि हृदय प्रेमाने भरलेले असते जसे पेला सुगंधाने भरलेला असतो. या स्तराबद्दल अल्लाह या आयत मध्ये स्पष्ट करतो की, श्रद्धावंतामध्ये काहीं असे आहेत जे परमेश्वराची मर्जी संपादन करण्यासाठी आपले जीवन वाहून देतात आणि परिणामस्वरूप परमेश्वर अशा व्यक्तिंवर आपली विशेष दया व कृपा अवतरीत करतो.

ते म्हणाले, ''ईश्वर तुमच्याकडून काय इच्छितो, एवढेच की तुम्ही मानवजातीशी न्यायाने वागावे.'' मग, त्याहूनही अधिक, ज्यांनी तुमचे काही चांगले केले नाही त्यांच्याशी चांगली वागणूक ठेवा. त्याहून अधिक महत्त्वाचे आहे की तुम्ही परमेश्वराच्या निर्मितीशी अशा करुणेने वागा जणू की तुम्ही त्यांचे खरे नातेवाईक आहात, जसे माता तिच्या मुलांशी वागते, कारण परोपकारी कधी कधी त्याच्या उपकाराची ख्याती करू इच्छितो परंतु आईसारखा अंतःकरणातून निःस्वार्थ होऊन कर्म करतो तो त्याचा कधीही देखावा करीत नाही. म्हणून सद्‌गुणांचा शेवटचा टप्पा आंतरिक उत्साह आहे जो आईसारखा असतो.

ही आयत केवळ निर्मितीबद्दलच नव्हे तर निर्मातािवषयी देखील आहे. ईश्वराशी न्याय करणे म्हणजे त्याची कृपा व देणगी यांची आठवण करून त्याची आज्ञापालक करणे होय. आणि ईश्वराशी दयाळूपणा म्हणजे त्याच्या अस्तित्वाबद्दल असा विश्वास बाळगणे जणू तो त्याला पाहात आहे आणि परमेश्वराशी जवळीक नाते स्थापित करणे म्हणजे त्याची उपासना नंदनवनाच्या लोभापोटी किंवा नरकाच्या भीतीपोटी करू नये, तर असे जर गृहीत धरले की स्वर्ग किंवा नरक नाही, तरी प्रेम आणि आज्ञापालनात फरक येऊ नये.

हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी काही ठिकाणी इस्लामची शिकवण बिगर मुस्लिमांना समजावून सांगताना या विषयाचे स्पष्टीकरण दिले आहे. तसेच त्यांनी आपल्या जमाअतला उपदेश करतानाही स्पष्टपणे नमूद केले आहे.

एका प्रसंगी ते म्हणाले की, न्यायाची अवस्था अशी आहे जशी एका सदाचारी व्यक्तिची नफ्से अम्मारा मध्ये पहायला मिळते, या अवस्थेच्या सुधारणेसाठी न्यायाचा आदेश आहे. या अवस्थेमध्ये काळजामध्ये उत्पन्न होणाऱ्या मनोकामनांचा विरोध करावा लागतो. उदाहरणार्थ, एखाद्याचे कर्ज फेडताना, मनात अशी इच्छा जागते की कोणत्या प्रकारे मी त्याला पैशे देण्यापासून दूर राहू. हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) म्हणालेः मला

खेदाने सांगावे लागते की काही लोक या गोष्टींकडे लक्ष देत नाहीत आणि आमच्या जमाअतमध्ये असे लोक आहेत जे कर्ज फेडण्याकडे किंचित लक्ष देतात. हे न्यायाच्या विरुद्ध आहे. पैगंबर मुहम्मद (स.) अशा लोकांची नमाज ए जनाजा अदा करत नसे. म्हणून तुमच्यापैकी प्रत्येकाने हे नीट लक्षात ठेवावे की, कर्ज फेडण्यात उशीर करू नये आणि सर्व प्रकारच्या विश्वासघात आणि अप्रामाणिकपणापासून दूर राहावे कारण ते अल्लाहच्या आज्ञेविरुद्ध आहे.

पुढे म्हणाले: सर्वशक्तिमान अल्लाहने या सर्व चांगल्या वागणूकींचा उल्लेख प्रसंगानुरुप केले आहे आणि वरील आयती मध्ये स्पष्ट केले आहे की जर हे सद्गुण योग्य वेळी आणि ठिकाणी जारी केले नाहीत तर ते वाईट बनतील. न्याय अश्लीलता बनेल, म्हणजे मर्यादा ओलांडणे इतके सोपे होऊन जाईल की अश्लीलता व अपवित्रतेचे प्रमाणात वाढ होईल आणि त्याचप्रमाणे दयाळूपणा नाकारल्यासारखे होईल. म्हणजेच बुद्धी आणि विवेक ज्या स्थितीला नाकारेल आणि त्याऐवजी ती जवळच्या आणि प्रिय व्यक्तीची विद्रोही होईल. किंबहुना कोणत्याही परिस्थितीत लोकांशी द्वेष आणि मत्सर प्रस्थापित करेल. खरे पाहिल्यास बगी म्हणजे अतिवृष्टी आणि शेतांची नासाडी करणारा पाऊस होय. तसेच अनिवार्य अधिकारांमध्ये कमतरता किंवा अधिकतेला बगी म्हणतात. त्यामुळे या तिघांपैकी जो कोणी आपल्या जागी उपयोगी पडत नाही, तो वाईट होऊन जाईल. म्हणून या तिघांसोबत वेळ आणि परिस्थिती एक आवश्यक अट म्हणून ठेवली गेली आहे.

हुजूर अनवर म्हणाले की, हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी आपल्या पुस्तकांमध्ये आणि सभेमध्ये या संदर्भात खूप उपदेश दिला आहे. त्यामुळे अल्लाहशी नातेसंबंधाचा दर्जा प्राप्त करण्यासाठी आणि जनसामान्यांचे हक्क पूर्ण करण्यासाठी त्यानुसार आचरण करण्याचा प्रयत्न करणे हे आपले कर्तव्य आहे. अल्लाह आम्हाला त्यानुसार जगण्याची, उपासनेचे उच्च दर्जा प्राप्त करण्याची, लोकांचे हक्क प्रस्थापित करण्याची, विशेषत: आपापसात प्रेम आणि आपुलकीचे नाते अशा प्रकारे प्रस्थापित करण्याची क्षमता देवो की आपण इतरांसाठी एक उदाहरण बनू. या गोष्टींचे पालन करून आपण निष्ठेचा हक्क फेडणारे होवो. दर शुक्रवारी हे वचन ऐकून त्यांच्यावर पालन करणारे बनू अन्यथा आपल्यात आणि इतरांमध्ये फरक राहणार नाही. अल्लाह आपल्या आणि इतरांमधील स्पष्ट फरक दाखववावे, जसे हजरत अपेक्षित मसीह (अ.स.) यांनी मोठ्या वेदनाने हे व्यक्त केले.

शेवटी हुजूर अनवर म्हणालेः पाकिस्तानातील परिस्थितीसाठी प्रार्थना करत राहा, सदाचार पसरवण्याचे काम करत राहा. सैतानी स्वभाव लोक तर अत्याचाराचे प्रकटन करत राहतील; ते त्यांचे काम आहे. अशा सैतान स्वभावाच्या लोकांशी आमची स्पर्धा नाही. आम्ही तर परमेश्वराची आज्ञापालन करणारे आहेत, सदैव ही प्रार्थना करा की अल्लाह आमच्या श्रद्धेला सुरक्षित ठेव आणि कोणत्याही परिस्थितीत आमचा विश्वास कमजोर पडू नये. अल्लाहशी आमचा संबंध एखाद्या जवळीक संबंधीसारखे स्थापित व्हावा तेव्हाच

आम्ही त्याचे चमत्कार आणि आशीर्वाद पूर्वीपेक्षा जास्त पाहसाल. इन्शाल्लाह. आणि जे अल्लाहच्या दृष्टीने शत्रू आहेत आणि अल्लाहच्या दृष्टीने अयोग्य आहेत, अल्लाह स्वत: त्यांचा नाश करो आणि, जेव्हा आमचा अल्लाहशी संबंधित घट्ट होईल तेव्हाच विरोधींच्या विनाशाची चित्रे तुम्ही पाहू शकतील.

اَلْحَمْدُ لِلّٰہِ! اَلْحَمْدُ لِلّٰہِ نَحْمَدُہٗ وَنَسْتَعِیْنُہٗ وَنَسْتَغْفِرُہٗ وَنُؤْمِنُ بِہٖ وَنَتَوَکَّلُ عَلَیْہِ وَنَعُوْذُ بِاللّٰہِ مِنْ شُرُوْرِ اَنْفُسِنَا وَمِنْ سَیِّئَاتِ
اَعْمَالِنَا مَنْ یَّھْدِہِ اللّٰہُ فَلَا مُضِلَّ لَہٗ وَمَنْ یُّضْلِلْہُ فَلَا ھَادِیَ لَہٗ وَنَشْھَدُ اَنْ لَّآ اِلٰہَ اِلَّا اللّٰہُ وَنَشْھَدُ اَنَّ مُحَمَّدًا عَبْدُہٗ وَرَسُوْلُہٗ،
عِبَادَ اللّٰہِ رَحِمَکُمُ اللّٰہِ اِنَّ اللّٰہَ یَاْمُرُ بِالْعَدْلِ وَالْاِحْسَانِ وَاِیْتَآءِ ذِی الْقُرْبٰی وَیَنْھٰی عَنِ الْفَحْشَآءِ وَالْمُنْکَرِ وَالْبَغْیِ یَعِظُکُمْ
لَعَلَّکُمْ تَذَکَّرُوْنَ اُذْکُرُوا اللّٰہَ یَذْکُرْکُمْ وَادْعُوْہُ یَسْتَجِبْ لَکُمْ وَلَذِکْرُ اللّٰہِ اَکْبَرُ۔